# उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर, यांचे कार्यालय


**प्रशासकिय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पू),मुंबई-४०००५१**

दूरध्वनी क्रं. ०२२-२६५१०१३६ ईमेल - sdomsdest@gmail.com


क्र. उविअ/का-५/कांदळवन/अहवाल/रे.अ./२०१९ दिनांक : २५/०७/२०१९

---

**प्रति,**

**मा. सदस्य सचिव,**
**कांदळवन संरक्षण, संवर्धन व संनियंत्रण समिती,**
**तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई**
**३०२, वेक फिल्ड हाऊस, तिसरा मजला,**
**ब्रिटानिया रेस्टॉरन्टजवळ, बॅलॉर्ड इस्टेट,**
**फोर्ट, मुंबई ४००००१**

विषय :- श्री. रेजी अब्राहम यांनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने स्थळनिरीक्षण व चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत...

संदर्भ :- मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखालील कांदळवन संरक्षण, संवर्धन व संनियंत्रण समितीच्या बैठकीत दिलेल्या सुचना, दिनांक २९/०६/२०१९

महोदय,

१. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखालील कांदळवन संवर्धन, संरक्षण व संनियंत्रण समितीकडे श्री. रेजी अब्राहम, रा. चारकोप, ता. बोरीवली, जि. मुंबई उपनगर यांनी कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत एकूण ... तक्रारी अर्ज सादर केलेले आहेत. सदर तक्रारी अर्जांच्या अनुषंगाने संबंधीत तक्रारदार यांचेसमक्ष स्थळनिरीक्षण व चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत समितीच्या दिनांक २९/०६/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत देण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने सदर अहवाल सादर करण्यात येत आहे.

२. श्री. रेजी अब्राहम, तकारदार यांनी कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत पुढीलप्रमाणे तक्रारी अर्ज आपणाकडे सादर केलेले असून सदरचे अर्ज या कार्यालयाकडे चौकशी व कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | तक्रार अर्जाचा दिनांक | तक्रारीचा विषय व संबंधीत ठिकाण |
|---|---|---|
| १ | २८/०५/२०१८ | मौजे मालवणी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र.२८४१ टिपू सुल्तान |

| | | |
|---|---|---|
| | | मैदान १ व २, लगून रोड मालवणी मालाड पश्चिम येथील कांदळवनाचा ऱ्हास केल्याबाबत तक्रार... |
| २ | ०१/०८/२०१८ | १) मौजे मालवणी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र.२८४१ टिपू सुल्तान मैदान १ व २, लगून रोड मालवणी मालाड पश्चिम येथील कांदळवनाचा ऱ्हास केल्याबाबत तक्रार...<br>२) मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील बफरझोन मध्ये श्री. संजय भंडारी व श्री. विवेक किणी यांनी शासकीय जमिनीवरील मोकळ्या जागेत भराव केल्याबाबत.. |
| ३ | ३१/०८/२०१८ | मौजे मालवणी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र.२८४१ टिपू सुल्तान मैदान १ व २, लगून रोड मालवणी मालाड पश्चिम येथील कांदळवनाचा ऱ्हास केल्याबाबत तक्रार... |
| ४ | ०४/०९/२०१८ | १) मौजे मालवणी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र.२८४१ टिपू सुल्तान मैदान १ व २, लगून रोड मालवणी मालाड पश्चिम येथील कांदळवनाचा ऱ्हास केल्याबाबत तक्रार...<br>२) चारकोप येथे मोठ्या प्रमाणात भूमाफिया व बिल्डर यांचे मार्फत अनधिकृत बांधकाम होत असल्याबाबत... |
| ५ | १६/०१/२०१९ | १) मौजे चारकोप गांव, कांदिवली पश्चिम या ठिकाणी कांदळवनक्षेत्रात बांधकाम करुन ६० रुमची चाळ बांधल्याबाबत...<br>२) चारकोप येथे कांदळवन क्षेत्रात आरएमसी कॉंक्रिटचे अनधिकृत चाळीचे बांधकाम केल्याबाबत |
| ६ | १९/०१/२०१९ | मौजे मालवणी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र.२८४१ टिपू सुल्तान मैदान १ व २, लगून रोड मालवणी मालाड पश्चिम येथील कांदळवनाचा ऱ्हास केल्याबाबत तक्रार... |
| ७ | ३१/०१/२०१९ | मौजे चारकोप येथील जलाराम मंदिराच्या मागे श्री. धिरज भंडारी भूमाफिया यांनी अनधिकृत गाऊंड प्लस वन अशा १७ खोल्या बांधल्याबाबत... |

३. वरीलप्रमाणे एकूण ७ तक्रार अर्जांपैकी चार तक्रार अर्ज हे मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील कांदळवन ऱ्हासाबाबत आहेत. त्यामुळे सदर चार तक्रार अर्जांच्या अनुषंगाने प्रत्यक्ष स्थळनिरीक्षण आणि चौकशी करण्यासाठी दिनांक १८/०७/२०१९ रोजी उपस्थित राहणेबाबत सर्व संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांना या कार्यालयाकडील दिनांक ०५/०७/२०१९ रोजीच्या पत्राने कळविण्यात आले होते. तसेच तक्रारदार श्री. रेजी अब्राहम यांना देखील वरील कार्यवाहीच्या वेळी उपस्थित राहाण्याबाबत पत्राने कळविण्यात आले होते. सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

४. उपरोक्त निश्चित केलेल्या दिवशी अर्थात दिनांक १८/०७/२०१९ रोजी मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील लक्ष्मीनगर ते डिंगेश्वर मंदिर या अर्धवर्तुळाकार भागातील कांदळवन क्षेत्राची व त्यालगत झालेल्या अनधिकृत कच्च्या / पक्क्या बांधकामांची पायी फिरून पाहणी करण्यात आली.

त्यावेळी सदर अर्धगोलाकार भागात आस्तित्वात असलेल्या खारफुटी / कांदळवन झाडांच्या क्षेत्रापासून ५० मीटर क्षेत्राच्या आत अनेक अनधिकृत पक्की बांधकामे, कच्ची बांधकामे, झोपड्या, गोदामे, दुकानांचे गाळे इत्यादी बांधण्यात आल्याचे दिसून आले. तसेच सदर पाहणी करण्यासाठी सदर कांदळवन क्षेत्रापासून जवळच असलेल्या उंच इमारतींचा वापर करण्यात आला. सनराईज चारकोप या वीस मजल्यांच्या इमारतीच्या विसाव्या मजल्यावरील टेरेसवर जाऊन सदर कांदळवन क्षेत्राची उंचावरून पाहणी करण्यात आली. त्यामुळे सदर क्षेत्राचे निरीक्षण करण्यासाठी Bird Eye View उपलब्ध झाला.

५. त्याचप्रमाणे डिंगेश्वर मंदिर व याच्या दक्षिणेस असलेले जलाराम मंदिर या दरम्यानच्या अर्धगोलाकार भागात देखील आस्तित्वात असलेल्या खारफुटी / कांदळवन झाडांच्या क्षेत्रापासून ५० मीटर क्षेत्राच्या आत अनेक अनधिकृत पक्की बांधकामे, कच्ची बांधकामे, झोपड्या, गोदामे, दुकानांचे गाळे इत्यादी बांधण्यात आल्याचे दिसून आले. या भागातील कांदळवनाची पाहणी उंचावरून करण्यात यावी, यासाठी वरील इमारतीच्या दक्षिणेस सुमारे अर्धा किलोमीटर अंतरावरील रुस्तमजी मेरिडियन या १९ मजल्यांच्या इमारतीच्या टेरेसचा वापर करण्यात आला.

६. वरील दोन्ही इमारतींच्या टेरेसवरून सदर अर्धवर्तुळाकार भागाचे मोठ्या क्षमतेच्या कॅमेऱ्याच्या सहाय्याने छायाचित्रण करण्यात आले असून काही छायाचित्रे या अहवालासोबत सादर केलेली आहेत. तसेच सदर संपूर्ण कार्यवाहीबाबत सविस्तर पंचनामा तयार करण्यात आला असून त्यावर संबंधित अधिकारी/कर्मचारी आणि तक्रारदार श्री. रेजी अब्राहम यांची स्वाक्षरी आहे. सदर पंचनाम्याची छायांकीत प्रत सोबत जोडली आहे.

७. सदर भागात आस्तित्वात असलेल्या खारफुटीच्या / कांदळवनाच्या क्षेत्रात, क्षेत्रालगत आणि क्षेत्रापासून ५० मीटरच्या आत अनेक अनधिकृत कच्ची / पक्की बांधकामे झालेली आहेत. तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ यांचेकडील आदेशाच्या दिनांकास अर्थात दिनांक ०६/१०/२००५ रोजी आस्तित्वात असलेल्या कांदळवन क्षेत्रापासून ५० मीटर क्षेत्राच्या आतील सर्व प्रकारची बांधकामे निष्कासीत करणे बंधनकारक आहे. सदर बाबीचा विचार केला असता, दिनांक ०६/१०/२००५ रोजी आस्तित्वात असलेली कांदळवन रेषा उपग्रह छायाचित्रांच्या आधारे किंवा अन्य तंत्र प्रणालीच्या आधारे निश्चित केल्याशिवाय आज रोजी आस्तित्वात असलेल्या कच्च्या / पक्क्या बांधकामांचे स्थान निश्चित करता येणार नाही. तसेच कांदळवनापासून ५० मीटरच्या क्षेत्रातील बांधकामे अनधिकृत व बेकायदेशीर ठरविणे शक्य होणार नाही, अशी या कार्यालयाची धारणा आहे. सन २००५ मधील कांदळवन रेषा वन विभागाकडून निश्चित करून, सदर रेषेपासून ५० मीटरचे अंतर निश्चित करून दिल्यानंतर, या दोन रेषांच्या दरम्यान येणाऱ्या क्षेत्रातील सर्व प्रकारचे अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याची कार्यवाही करणे शक्य होणार आहे. यास्तव, वरीलबाबत आपल्या स्तरावरून मार्गदर्शन आणि तांत्रिक सहाय्य मिळणेबाबत विनंती करण्यात येत आहे.

८. तसेच या कार्यालयामार्फत तहसीलदार बोरीवली यांचे देखरेखीखाली दिनांक ०६/०६/२०१९ व दिनांक ०७/०६/२०१९ रोजी वरील अर्धवर्तुळाकार भागातील सुमारे २९० अनधिकृत बांधकामे

तोडून निष्कासीत करण्यात आली होती. मात्र दिनांक १८/०७/२०१९ रोजी केलेल्या स्थळपाहणीच्या वेळी वरील भागात झोपड्या व अनधिकृत बांधकामे पुर्ववत झाले असल्याचे दिसून आले आहे. अर्थातच कांदळवन क्षेत्राचे संरक्षण होण्याच्या दृष्टिकोनातून कायमस्वरूपी उपाययोजना, कुंपन भींत, इत्यादी करणे आवश्यक आहे, असे या कार्यालयाचे नम्र मत आहे.

वरील संदर्भात आपल्या स्तरावरून उचित मार्गदर्शनपर आदेश व तांत्रिक सहाय्य मिळणेस विनंती आहे. सदरचा अहवाल सविनय सादर.

(उमेश बिरारी)
**उपविभागीय अधिकारी**
**मुंबई पश्चिम उपनगर**

# पंचनामा

चारकोप
दि.18/07/2019

आम्ही खालील सह्या करणारे पंच प्रत्यक्ष परिस्थिती पाहून वस्तुस्थितीदर्शक पंचनामा लिहून देतो की, मौजे चारकोप येथील लक्ष्मीनगर ते डिंगेश्वर मंदिर या अर्धवर्तुळाकार भागातील खारफुटी/मॅन्ग्रोव्हच्या झाडांच्या क्षेत्रापासून 50 मिटरच्या आत करण्यात आलेल्या अनधिकृत पक्के बांधकाम, कच्चे बांधकाम, झोपड्या, गोदामे, दुकानांचे गाळे इत्यादींची समक्ष पाहणी करण्यात आली. तसेच या क्षेत्राचे विहंगम दृश्य पाहता यावे या उद्देशाने सदर भागातील सनराईज-चारकोप या इमारतीच्या 20 व्या मजल्यावरील टेरेसवर जावून पाहणी केली असता, कांदळवन क्षेत्रापासून 50 मिटरचे अंतर न सोडता अनेक कच्चे व पक्के बांधकाम, झोपड्या इत्यादी बांधलेल्या/उभारलेल्या असल्याचे स्पष्टपणे दिसुन येते.

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ यांचेकडील आदेश दि. 06/10/2005 मधील निर्देशानुसार कांदळवन क्षेत्राच्या सन 2005 मध्ये असलेल्या हद्दीपासून 50 मीटरच्या आतील क्षेत्रात कोणतेही बांधकाम करता येणार नाही. आज रोजी सदर कांदळवन क्षेत्र आणि कांदळवन क्षेत्राच्या लगत किंवा परिसरात उभी असलेली कच्ची/पक्की बांधकामे ही कांदळवन क्षेत्राच्या सन 2005 मधील हद्दीपासून निश्चित किती अंतरावर आहे, हे फक्त नजर फिरवून किंवा प्रत्यक्ष पाहणी करुन सांगणे शक्य होत नाही. यासाठी सन 2005 मधील सदर कांदळवन क्षेत्राचे उपग्रह चित्र नकाशे व चालु परिस्थितीतील कांदळवन क्षेत्राचे उपग्रह चित्र नकाशे यांची तुलना करणे आवश्यक आहे. सदर तुलना केल्यानंतर मागील 14 वर्षात कांदळवन क्षेत्राच्या हद्दीमध्ये निश्चित कोणत्या स्वरुपाचा बदल झाला हे सांगणे शक्य होईल असे आम्हा पंचाचे मत आहे.

यानंतर सनराईज-चारकोप या इमारतीपासून अंदाजे अर्धा किलोमीटर अंतरावर असलेल्या व दक्षिण दिशेला असलेल्या रुस्तमजी मेरीडीईन या इमारतीच्या 19 व्या मजल्यावरील टेरेसवर जावून पुढील कांदळवन क्षेत्राची पाहणी करण्यात आली. सदर इमारतीवरुन डिंगेश्वर मंदिर व त्याच्या दक्षिणेस असलेले जलाराम मंदिर येथपर्यंतच्या अर्धा गोलाकार भाग

(क्र.म.प.)

व्यवस्थितपणे दिसून येतो. सदर भागात देखील अनेक लहान-मोठी, कच्ची/पक्की बांधकामे, झोपड्या इ. उभारलेले असल्याचे दिसून आले. सदरची कच्ची/पक्की बांधकामे सन 2005 मधील कांदळवन क्षेत्राच्या हद्दीपासून 50 मीटर क्षेत्राच्या आत आहेत किंवा कसे, हे आज रोजी असलेल्या कांदळवन क्षेत्राच्या हद्दीवरून सांगता येत नाही. मात्र याठिकाणी देखील अगदी कांदळवन क्षेत्राच्या लगत अनेक कच्ची/पक्की बांधकामे, झोपड्या उभ्या असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

सदर संपुर्ण कांदळवन क्षेत्राचे वरील दोन्ही इमारतींच्या छतावर उभे राहून अद्ययावत कॅनॉन कंपनीच्या डीएसएलआर कॅमेराच्या माध्यमातून फोटो काढण्यात आले. सदरची क्षेत्र निरीक्षणाची कार्यवाही सुरु असताना मा. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर जिल्हा, श्री. चव्हाण एस. एम. निवासी नायब तहसिलदार बोरीवली श्री. तानाजी रुपनर, सहायक अभियंता, आर/दक्षिण, इमारत व कारखाने (एमसीजीएम), श्री. विकास पटले, दुय्यम अभियंता श्री. संजय पगारे, परिमंडळ वनअधिकारी, कांदळवन पश्चिम मुंबई, श्रीम. गीता सुर्वे, प.भु. न.भु. बोरीवली श्री. वारघडे प.भु. न.भु. बोरीवली व श्री. मोरजकर तलाठी कांदिवली हे हजर आहेत तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे तक्रारदार श्री. रेजी अब्राहम रा. चारकोप, अध्यक्ष युनायटेड असोसिएशन ट्रस्ट हे संपुर्ण कार्यवाही दरम्यान हजर आहेत. तसेच फोटोग्राफर श्री. अमित पाटील, हे हजर आहेत.

वरीलप्रमाणे पंचनामा दुपारी 12:15 वाजता सुरु करुन 1:45 वाजता लिहून पुर्ण केला असे.

① श्री. विशाल अशोक कामोठी, वय 32 वर्षे
रा. 4/938, अशोक सम्राट सो. से-9, चारकोप,
कांदिवली (प) मुंबई-67, मो. नं. 8424882194

18/7/19

② श्री. व्यंकट माधवराव जाधव वय 40 वर्षे
रा. हॉटेल मेस्त्री चाळ, गुंफाआश्रम,
अंधेरी (पु) मो. नं. 9867096360

समक्ष

S.D.O
MUMBAI
(W.)

R.N.T
Borivali

MNCU
(Forest)

श्री. रेजी अब्राहम
(तक्रारदार)